आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२६ एप्रिल २०२६ - रविवार

## ठळक बातम्या

- भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून प्रतिपादन

- महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत कर्करोगासारख्या गंभीर आजारांवर उपचार उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस असल्याची आरोग्यमंत्र्यांची घोषणा

- ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं दीर्घ आजारानं निधन

**आणि**

- विदर्भात बहुतांश जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा/ वर्धा, अमरावती आणि अकोला जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट

**<><><><><>**

भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असून याच विचारानं आपले शास्त्रज्ञ नागरी अणू कार्यक्रम पुढे नेत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवर **मन की बात** या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३३वा भाग होता. काही दिवसांपूर्वीच तमिळनाडूच्या कल्पक्कम इथल्या फास्ट ब्रीडर रिॲक्टरनं क्रिटिकॅलिटीचा टप्पा गाठल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी आजच्या मन की बातमध्ये केला. हे अणू संयंत्र पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानानं तयार करण्यात आलं असून, या ऐतिहासिक यशामुळे यामुळे विकसित भारताच्या संकल्पाला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासाठी योगदान दिलेल्या सर्वांचं त्यांनी अभिनंदन केलं.

आता भारताची पवन ऊर्जा निर्मिती क्षमताही ५६ गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे, आज भारत पवन ऊर्जा क्षमतेमध्ये जगात चौथ्या स्थानावर पोहोचला आहे, हे यश आपल्या अभियंत्यांचं, युवा वर्गाच्या परिश्रमाचं तसंच देशाच्या सामूहिक इच्छाशक्तीचं प्रतीक आहे असं ते म्हणाले. या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

येत्या काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार असल्याचं स्मरण करून देत त्यांनी बुद्ध विचारांचं महत्व अधोरेखित केलं.

**होल्ड बाईट - MKB GAUTAM BUDHHA**

देशाच्या विविध भागांत निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. निसर्ग आणि मानव वेगवेगळे नसून आपण एकमेकांचे सोबती आहोत, ज्यावेळी आपण निसर्गाचा विचार करतो आणि त्याच्या सोबत वाटचाल करतो, तेव्हा बदल स्पष्टपणे दिसून येतो, असं त्यांनी सांगितलं.

भारतीय राष्ट्रीय अभिलेखागारानं एका पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या ऐतिहासिक दस्तऐवजांविषयी त्यांनी माहिती दिली.

फ्रान्समध्ये झालेल्या युरोपियन गर्ल्स मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाडमध्ये भारतीय विद्यार्थिनींनी मिळवलेल्या यशाचं कौतुक त्यांनी केलं. या पथकातील मुंबईच्या श्रेया मुंदडा हिचा उल्लेखही त्यांनी केला.

देशात जनगणना २०२७ डिजिटल पद्धतीनं राबवली जात असून, या प्रक्रियेअंतर्गत जनगणनेचे कर्मचारी आपल्याकडे येण्याआधी १५ दिवस नागरिक स्वतः स्वगणनेची प्रक्रिया पूर्ण करू शकतात, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात शिरपूरमध्ये राबवण्यात आलेलं जलसंधारणाचं मॉडेल राज्यात आदर्श ठरलं असून, आता शिक्षण क्षेत्रातही शिरपूरनं देशपातळीवर ठसा उमटवला

आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले आहेत. शिरपूर इथल्या केतकीबेन मुकेशभाई पटेल सेंट्रल लायब्ररीला आज सकाळी मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. हे ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी ज्ञानकेंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><>**

नाग भूषण अवॉर्ड फाउंडेशनच्या वतीनं दिला जाणारा यंदाचा नागभूषण पुरस्कार आज संरक्षण उद्योजक सत्यनारायण नुवाल यांना समारंभपूर्वक दिला गेला. यानिमीत्तानं नागपूर इथं झालेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसंच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत उपस्थित होते.

**<><><><><>**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः प्रवेश नियंत्रित बवनण्यासाठीच्या मिसिंग लिंक या महत्त्वाच्या प्रकल्पाचं ९९ टक्के काम पूर्ण झालं असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. शिंदे यांनी आज या प्रकल्पाला भेट देऊन कामाची पाहणी केली, त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. येत्या १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रकल्पाचं उद्घाटन होईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत विविध गंभीर आजारांवर सामान्यांसाठी उपचार उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाचा मानस असल्याची घोषणा राज्याचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली आहे. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या ३१ व्या स्थापना दिन समारंभात ते बोलत होते. मेंदुविकार, अस्थिरोग, कर्करोगासारख्या दुर्धर आणि गंभीर आजारांचा त्यात समावेश आहे. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते भारती

हॉस्पिटल इथल्या नूतनीकरण केलेल्या महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचं कार्यालय, अत्याधुनिक नेत्ररोग विभाग आणि नेत्रपेढी तसेच आयव्हीएफ केंद्राचे उद्घाटन आणि विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचं प्रकाशन करण्यात आलं.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यातले अनेक नगरसेवक आपल्या संपर्कात असून, लवकरच तिथे काँग्रेसची सत्ता येईल असा दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ते आज  नागपूर मध्ये वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेसने आपल्या काही चुकांमुळे तिथली सत्ता गमावली असेल, पण आता हे चित्र बदलल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं आज पहाटे नवी दिल्ली इथं दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. रघु राय यांच्या पार्थिवावर नवी दिल्लीत लोधी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले.

रघु राय यांच्या जीवनाविषयी अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**------व्हीसी-----**

*(१८ डिसेंबर १९४२ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतात 'झांग' इथं जन्मलेले रघु राय हे  एक  स्थापत्य अभियंता होते. वयाच्या २३व्या वर्षीच त्यांनी छायाचित्रण करायला सुरुवात केली, आणि १९६६ मध्ये 'द स्टेट्समन' या वृत्तपत्रात प्रमुख छायाचित्रकार म्हणून ते रुजू झाले. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीची पुढली सहा दशकं भारताच्या सामाजिक-राजकीय पटलावरच्या अनेक  घडामोडींची साक्ष ठरली.*

*१९७२ मधली बांगलादेश निर्वासितांची समस्या, १९८४ची भोपाळ वायू दुर्घटना यासारख्या देशाच्या आधुनिक इतिहासातल्या काही अत्यंत संवेदनशील घटना,  त्यांनी आपल्या कॅमेरात टिपल्या. ख्यातनाम व्यक्तींच्या छायाचित्रांमधून त्यांनी देशाच्या सामाजिक, राजकीय आणि अध्यात्मिक छटा टिपल्या, आणि या व्यक्तींच्या जीवनाकडे पाहण्याचा आतापर्यंत अज्ञात असलेला नवा दृष्टिकोन सादर केला.*

*प्रामुख्यानं कृष्ण-धवल माध्यमातल्या आपल्या छायाचित्रांमधून त्यांनी अत्यंत सामान्य गोष्टींनाही असाधारण रूप दिलं. आपल्या प्रदीर्घ, गौरवशाली कारकिर्दीत राय यांनी भारतातल्या काही आघाडीच्या नियतकालिकांसोबत काम केलं. गेल्या काही वर्षांत, त्यांचे छायाचित्र-निबंध 'टाइम', 'लाईफ', 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'द इंडिपेंडंट' आणि 'द न्यू यॉर्कर' यांसारख्या जगप्रसिद्ध प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध  झाले. 'रघु रायज इंडिया: रिफ्लेक्शन्स इन कलर अँड रिफ्लेक्शन्स इन ब्लॅक अँड व्हाईट' तसंच 'एक्स्पोजर: पोर्ट्रेट ऑफ अ कॉर्पोरेट क्राईम' यांसारखी काही पुस्तकंही त्यांनी लिहिली.*

*राय यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. बांगलादेश युद्ध आणि त्यानंतरच्या घडामोडींच्या वार्तांकनासाठी भारत सरकारनं १९७२ मध्ये त्यांना 'पद्मश्री' पुरस्कारानं सन्मानित केलं गेलं. )*

**<><><><><>**

येत्या १ मे पासून राज्य मार्ग परिवहन महामंडळाचं **'आपली बस, आपली सेवा'** हे नवं अभियान सुरू होणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. एस टी महामंडळानं जारी केलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. या अभियानांतर्गत बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन चालक वाहकांना बंधनकारक असेल.

**<><><><><>**

वर्धा, अमरावती आणि अकोला इथं हवामान विभागाने आज आणि उद्या उष्णतेचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. नागपूर, चंद्रपूर, बुलढाणा आणि भंडारा इथंही उष्णतेची लाट येण्याचा अंदाज आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि

मराठवाड्यातील नांदेड, लातूर आणि धाराशीवमधे पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यात बाकी ठिकाणी हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

**//<><><><><>//**